14 SEP 2017 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा आजपासून युवा महोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ३७ व्या युवा महोत्सवाची सुरुवात गुरुवारपासून (दि. १४) होत आहे. सातारा जिल्ह्यातील फलटण येथील मुधोजी महाविद्यालयापासून याची सुरुवात होईल. कोल्हापूर जिल्हास्तरीय महोत्सव दि. १८ रोजी चंदगडमधील आर. बी. माडखोलकर महाविद्यालयात होणार आहे. २५ ते २७ सप्टेंबरदरम्यान गारगोटी (ता. भुदरगड) येथे मध्यवर्ती युवा महोत्सव होणार आहे. प्रशासाकडून महोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

- चंदगडला १८ रोजी जिल्हा महोत्सव
- गारगोटीत २५ पासून मध्यवर्ती महोत्सव

युवा महोत्सवाच्या अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा पार पडल्या. एकूण २६ विविध प्रकारांत युवा महोत्सवासाठी स्पर्धा होणार आहेत. एकूण दीडशे महाविद्यालयांतील तीन हजार विद्यार्थी महोत्सवात सादरीकरण करणार आहेत. जिल्हास्तरीय महोत्सवानंतर



मध्यवर्ती युवा महोत्सव २५, २६ व २७ सप्टेंबर रोजी होणार आहे. तर सांगली जिल्हास्तरीय महोत्सव पलूस येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १६ सप्टेंबरला होणार आहे.

### विद्यापीठाचा पहिल्यांदाच सहभाग

यंदाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विद्यापीठाचा संघ पहिल्यांदाच सहभागी होणार आहे. यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकडून स्पर्धेसाठी रंगीत तालीम सुरू आहे. विद्यापीठ कॅम्पसमधील पन्नास विद्यार्थी अकरा प्रकारांत सहभागी होत असल्याची माहिती विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.

14 SEP 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवात १५०० विद्यार्थी होणार सहभागी

प्रतिनिधी
गारगोटी

येथील मौनी विद्यापीठात २५ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. कर्मवीर हिरे महाविद्यालय संयोजन करणार असून,. शंभर महाविद्यालयातील सुमारे १५०० विद्यार्थी सहभागी होणार असल्याची माहिती संचालक डॉ. आर. डी. बेलेकर यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

तें म्हणाले, मौनी विद्यापीठात तीन दिवसीय महोत्सव होत आहे. याअंतर्गत होणारे कार्यक्रम चार व्यासपीठावर होतील. यात २८



प्रकारच्या स्पर्धांचा समावेश असून, कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील जिल्हास्तरीय स्पर्धेतील विजेते संघ यात सहभागी होतील. २५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत नोंदणी करण्यात येईल., त्यानंतर लोकवाद्यवृंद, लोककला, एकांकिका, शास्त्रीय गायन, शास्त्रीय तालवाद्य, रांगोळी, कोलाज, पथनाट्य, मराठी वक्तृत्व, हिंदी वक्तृत्व, इंग्रजी वक्तृत्व, वादविवाद स्पर्धा होतील. २६ रोजी पाश्चिमात्य एकलगीत, पाश्चिमात्य समूहगीत, लोकनृत्य, सुगमगायन, मुकनाट्य लघुनाटिका, शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय सुरवाद्य, पोस्टर मेकिंग, व्यंगचित्रण, मातीकाम, स्पॉट फोटोग्राफी स्पर्धा होईल.

२७ रोजी नकला, एकपात्री, प्रश्नमंजूषा, स्पॉट पेटींग स्पर्धेनंतर बक्षीस वितरण होईल. बैठकीस प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे, उपप्राचार्य ए. जे. गोडसे, डॉ. शहाजी वारके, प्रा. निशिकांत चव्हाण, प्रा. अरविंद चौगले, डॉ. सागर पोवार, अधीक्षक अरविंद देसाई उपस्थित होते.

14 SEP 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकांनी समाजोपयोगी संशोधन करावे

## इंडियन सोशॉलॉजिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. आनंदकुमार यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

सामाजिक शास्त्रातील संशोधकांनी नेहमी सत्याची कास धरली पाहिजे. सामाजिक संशोधन हे आव्हानात्मक असते त्यामुळे संशोधकांनी समाजोपयोगी संशोधन केले पाहिजे, असे प्रतिपादन इंडियन सोशॉलॉजिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. आनंदकुमार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात यु. जी. सी. सॅप डिआरएस फेज – तीन अंतर्गत समाजशास्त्र विभाग आणि सुरत येथील सेंटर फॉर सोशल स्टडीज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पाच दिवशीय "सामाजिक शास्त्रातील संशोधन पध्दती" या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते.




कोल्हापूर : समाजशास्त्र विभागातर्फे आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. आनंदकुमार. सोबत डॉ. जगन कराडे, प्र–कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. बी. पाटील.

संशोधकांनी नेहमी जिज्ञासू वृत्तीने राहायला हवे. त्यातून संवाद तयार होऊन ज्ञानाचा विस्तार होण्यास मदत होते. सद्य सर्वच विषय हे परस्परावलंबी असून ती काळाची गरज बनलेली आहे. गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी संशोधकाने विषयाशी तादात्म्य व्हावे लागेल. अध्यक्षस्थानावरुन बोलताना प्र–कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सामाजिक शास्त्रातील संशोधकांनी केलेले संशोधन समाजाला कसे उपयोगी पडेल याचा विचार संशोधकांनी प्रथम करावा, समाजाची उन्नती ही नवनवीन शोधामुळे होण्यास मदत होते. सद्यकालीन युगात संशोधकांनी पारंपारिक पध्दतीने संशोधन न करता नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन घेवून संशोधन करावे.

समाजशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख, प्रा. डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रतिमा पवार आभार यांनी मानले. यावेळी माजी विभागप्रमुख, डॉ. आर. बी. पाटील, डॉ. पी. एम. माने यांच्यासह एम. फिल., पीएच. डी. चे संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

14 SEP 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योगा स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ जाहीर

## आंतरविभागीय स्पर्धा संपन्न : मुलांत सिध्दीविनायक अमनगी तर मुलींमध्ये क्षितीजा पाटील प्रथम

वार्ताहर
मुरगूड

आखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगा स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ निवडण्यात आला आहे. येथील जय शिवराय एज्युकेशन सोसायटी संचलित सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतर विभागीय योगा स्पर्धेचा संघ निवडण्यात आला. या निवड स्पर्धेमध्ये मुलांमध्ये महागावच्या संत गजानन पाटील इंजि. कॉलेजचा सिध्दीविनायक अमनगी तर मुलींमध्ये मिरजेच्या एटीएस कॉलेजची क्षितीजा पाटील यांनी अव्वलस्थान पटकावले.

या स्पर्धेमध्ये कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयाचे ,योगा खेळाडू सहभागी झाले होते. ओरिसा, भुवनेश्वर येथे होणाऱ्या आखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा पुरूष व महिला संघ या स्पर्धेतून निवडण्यात आला. एसी कॉलेज गडहिंग्लजचे प्रा. सुरेश धुरे, मंडलिक महाविद्यालय मुरगूडचे डॉ. प्रा. शिवाजी पोवार आणि कमला कॉलेज कोल्हापूरच्या प्रा. डॉ. सौ. सुनिता काळे या निवड समितीच्या सदस्यांनी संघनिवडीचे काम पाहिले.

स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ मंडलिक कॉलेजचे प्राचार्य डॉ. अर्जून कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली व उपप्राचार्य डॉ. शिवाजी होडगे आणि कार्यालय अधिक्षक दिलीप कांबळे यांच्या उपस्थितीत झाले. महाविद्यालयाच्यावतीने निवड झालेल्या खेळाडूंना सन्मानचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून आलेले योगा खेळाडू व प्रशिक्षक आणि दर्शक उपस्थित होते.



**मुरगूड : शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय योगा स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंसमवेत प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, स्पर्धासचिव डॉ. शिवाजी पोवार,, उपप्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, दिलीप कांबळे व अन्य मान्यवर.**

### निवड झालेला पुरूष संघ

सिध्दीविनायक मल्लीकार्जून अमनगी (संत गजानन महाराज इंजि. कॉलेज महागाव), रोहीत जानबा कुरूणकर (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज), संकल्प संभाजी पाटील (भोगावती महाविद्यालय, कुरूकली), गणेश गोपीनाथ खताल (डीपी भोसले कॉलेज, कोरेगाव), अमोल संजय तिबीले (जेपी नाईक कॉलेज, उत्तूर), अभिजीत अरूण वडगावे (जेजे. मगदूम कॉलेज ऑफ इंजि. जयसिंगपूर), आदर्श जितेंद्र जाधव (लालबहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा)

### निवड झालेला महिला संघ

कु. क्षितीजा सुभाष पाटील (एटीएस कॉलेज मिरज), श्रध्दा बाळासो चावरे (डी. आर. माने कॉलेज, कागल), कु. मयूरी प्रकाश वर्दी, कु. नम्रता संजय बट्टे, कु. मोहिनी बाजीराव घोरपडे (तिघीही व्यंकटेश महाविद्यालय, इचंलकरंजी), धनश्री सुनिल दातार (कमला कॉलेज, कोल्हापूर), मयूरी सुनिल पोतदार (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज), ऋचा आनंदा कदम-पाटील (भोगावती कॉलेज, कुरूकली.)

स्वागत व प्रास्ताविक स्पर्धा सचिव प्रा. डॉ. शिवाजी पोवार व सुत्रसंचालन प्रा. पांडुरंग फराकटे यांनी केले. प्रा. डॉ. ए. जी. मगदूम यांनी आभार मानले.

14 SEP 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या योगा संघाची निवड

## भुवनेश्वर, ओडीसा येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा

मुरगूड / प्रतिनिधी :

येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात झालेल्या आंतरविभागीय योगा स्पर्धेतून भुवनेश्वर ( ओडिसा) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पुरुष (६) व महिला (६) खेळाडूंचा शिवाजी विद्यापीठाचा योगाचा संघ निवडण्यात आला.

शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय योगा स्पर्धा सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धत सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील महिला, पुरुष संघानी सहभाग घेतला होता. हा संघ निवडण्यासाठी शिवाजी विद्यापीठ निवड समिती सदस्य म्हणून सुरेश धुरे (ए. सी. कॉलेज, गडहिंग्लज), शिवाजी पोवार (सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड) व सुनीता काळे (कमला कॉलेज) यांनी, तर निरीक्षक म्हणून एन. आर. कांबळे यांनी काम पाहिले.



**मुरगूड : मंडलिक महाविद्यालयात झालेल्या आंतरविभागीय योगा स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंसमवेत प्राचार्य अर्जुन कुंभार, स्पर्धा सचिव शिवाजी पोवार.**

भुवनेश्वर (ओडीसी) येथे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी महिला (६) व पुरुष (६) खेळाडूंचा निवडण्यात आलेला **मुलींचा संघ :** क्षितिज पाटील (एटीएस मिरज), श्रद्धा चावरे ( डी. आर. माने कागल), मयुरी वरदी (व्यंकटेश, इचलकरंजी), नम्रता बट्टे (व्यंकटेश, इचलकरंजी), मोहिनी घोरपडे (व्यंकटेश इचलकरंजी), धनश्री दातार (कमला कॉलेज कोल्हापूर) **पुरुष संघ :** सिद्धिविनायक अमनगी (गजानन महाराज इंजि. महागाव), रोहित कुरुणकर, शिवराज गडहिंग्लज, संकल्प पाटील (भोगावती, कुरुकली), गणेश खटाळ (डी. पी. भोसले, कोरेगाव), अमोल तिबिले (जेपी नाईक उत्तूर), अभिजित वादगवे (जे. जे. मगदूम, जयसिंगपूर)

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार होते. तर उपप्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, कार्यालयीन अधीक्षक दिलीप कांबळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्पर्धा संयोजक सचिव शिवाजी पोवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन पी. आर. फराकटे यांनी केले.